दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे    सपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ सोमवार दिनांक 09 जून 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक :15 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935

# मणिपूर पुन्हा पेटले

## बस जाळल्या; मालमत्तेची तोडफोड

■ पाच जिल्ह्यांतील इंटरनेट, मोबाइल सेवा बंद ■ निदर्शकांचा आत्मदहनाचा प्रयत्न ■ एका जिल्ह्यात संचारबंदी

**इम्फाळ : मैतेई आणि कुकी यांच्यातील वांशिक संघर्षांमुळे आणि राजकीय उदासीनतेमुळे गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ धुमसत असलेल्या मणिपूरमध्ये शनिवारी पुन्हा एकदा हिंसाचाराचा उद्रेक झाला. मैतेई समाजाचे नेते अरामबाई तेंगगोल यांच्या अटकेनंतर जमाव रस्त्यावर उतरला आणि त्यांनी अनेक ठिकाणी हिंसक निदर्शने केली. त्यामुळे राज्यातील पाच जिल्ह्यांमधील इंटरनेट आणि मोबाइल सेवा पाच दिवसांसाठी बंद करण्यात आली आहे, तर विष्णुपूर जिल्ह्यात संचारबंदी जारी करण्यात आली आहे.**



मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमध्ये मैतेई संघटनेच्या नेत्यासह अनेक जणांना अटक केल्यानंतर हिंसाचार उसळला. निदर्शकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला त्यावेळी पोलिसांशी त्यांची झटापटही झाली. निदर्शकांनी रस्त्यांवर अनेक ठिकाणी आगी लावल्या, बसेस जाळल्या, मालमत्तेची तोडफोडही केली. आंदोलकांनी स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याची धमकीही दिली असून याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. यामध्ये अनेक आंदोलक उभे राहून स्वतःवर पेट्रोल ओतत असल्याचे दिसत आहे. टेंगगोल यांना अटक केल्यानंतर इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली.

त्यानंतर, राजधानी इम्फाळच्या अनेक भागात निदर्शक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. इम्फाळच्या खुराई लामलोंग भागात, निदर्शकांच्या संतप्त जमावाने बस जाळल्या, टायर जाळून रस्ते अडवले. निदर्शक इथेच थांबले नाहीत, तर ते इम्फाळ विमानतळाच्या तुलिहाल गेटबाहेर जमले. निदर्शकांनी रात्री विमानतळ रस्त्यावरील वाहतूकही रोखली. या वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बळाचा वापर केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यादरम्यान, लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, बिष्णुपूर जिल्ह्यात संपूर्ण संचारबंदी लागू करण्यात आली आहे, तर इम्फाळ पूर्व, इम्फाळ पश्चिम, थौबल आणि काकचिंगमध्ये पाचपेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

अरामबाई यांच्या अटकेच्या आडून काही असामाजिक तत्त्वे समाज माध्यमांचा वापर करून

संमिश्र पानावर

### दोन वर्षांपासून मणिपूर अशांत

मणिपूर ३ मे २०२३ पासून अशांत आहे. मैतेई बहुल आणि कुकी बहुल परिसरात हिंसा झाली. तेव्हापासून हे दोन्ही समाज एकमेकांवर आरोप करत आहेत. त्यातून त्यांच्यात हिंसा झाली आहे. कुकी समाजाला सध्या राज्यात अनुसूचित जमातीचा (एसटी) दर्जा देण्यात आला आहे. मैतेई समाजही अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याची मागणी करत आहे, तर कुकी समाजाने मैतेईंच्या या मागणीला कडाडून विरोध केला आहे. तेव्हापासून दोन्ही समाजांत सातत्याने हिंसक घटना घडत आहेत. मणिपूरचे मुख्यमंत्री बीरेन सिंह यांनी ९ मे रोजी पदाचा राजीनामा दिला आहे. सध्या मणिपूरमध्ये राष्ट्रपती शासन लागू आहे.

# मोदी सरकारची ११ वर्षे पूर्ण

### मोदींची सत्तेवर भक्कम पकड कायम



**नवी दिल्ली :** २०१४, २०१९ नंतर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाले. मोदी यांनी ९ जून २०२४ रोजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. सोमवारी मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण होणार आहेत.

२०२४ च्या निवडणूक प्रचारात पंतप्रधान मोदी यांनी ४०० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले होते. या निवडणूक प्रचारात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजप सरकारविरोधात जोरदार प्रचार केला होता. या निवडणुकीत भाजपचे सरकार जाईल, असे वाटत होते. पण, भाजपने नितीश कुमार व चंद्रबाबू नायडू यांचे समर्थन घेऊन सरकार स्थापन केले.

मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिली वर्षपूर्ती आणि एकूण ११ वा कार्यकाळ साजरा करताना, पंतप्रधान मोदी सत्तेवर ठाम आणि आत्मविश्वासाने कार्य करत आहेत. तेलगू देसम व जदयू या प्रादेशिक पक्षांनी मोदी सरकारला भक्कम पाठिंबा दिला.

लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने आपल्या राजकीय आणि शासकीय धोरणांमध्ये फेरबदल करून विधानसभा निवडणुकांमध्ये आश्चर्यजनक

संमिश्र पानावर

### काँग्रेसचा सातत्याने पराभव

निवडणुकांमध्ये काँग्रेसचा सातत्याने पराभव होत आहे. तृणमूल काँग्रेस आणि केजरीवाल यांच्यासारखे इतर विरोधक काँग्रेसपासून दूर गेले आहेत. शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांचे भवितव्य अनिश्चित दिसते.

# उत्तर हवे असल्यास आम्हाला पत्र लिहा

## राहुल गांधी यांच्या आरोपावर केंद्रीय निवडणूक आयोगाची भूमिका




### निवडणूक आयोगाने संभ्रम दूर करावा!

**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच संशय बळावला असल्याने या गंभीर प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोगाने देऊन संभ्रम दूर करणे अपेक्षित असताना भाजपकडून त्याची उत्तरे दिली जात आहेत हे आणखी गंभीर असून निवडणुकीत मॅच फिक्सिंग झाले यावर शिक्कामोर्तब करणारे आहे, असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटले आहे.

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 'मॅच फिक्सिंग' झाल्याचा आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी करून निवडणूक आयोगाकडून खुलासा मागवला होता. आता विरोधी पक्षनेते आम्हाला थेट पत्र लिहितील, तेव्हा आम्ही त्यांना उत्तर देऊ, असे केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी सांगितले.

सूत्र म्हणाले की, आपल्या संपर्क

संमिश्र पानावर

### भुशी डॅममध्ये दोन तरुणांचा बुडून मृत्यू

**पुणे :** लोणावळ्यातील भुशी डॅम येथे पाण्यात बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी घडली. लोणावळा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, दोन्ही मृतदेह पाण्यातून काढून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले.

उत्तर प्रदेशातील दोन तरुण आपल्या मित्रांसह लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरात फिरायला गेले.

संमिश्र पानावर

# रत्नागिरीजवळ टँकरची ट्रॅव्हल्सला धडक; २६ शिक्षक जखमी

**रत्नागिरी :** सावर्डे, संगमेश्वरमधील शिक्षक रविवारी सकाळी खासगी ट्रॅव्हल्सने रत्नागिरीकडे चालले होते. रत्नागिरीजवळ बाव नदीच्या परिसरात गॅस टँकरने धडक दिल्याने ट्रॅव्हल्स गाडी १५ फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात गाडीतील २६ शिक्षक जखमी झाले आहेत.

या अपघातामुळे मुंबई-गोवा



महामार्ग काहीकाळ ठप्प झाला होता. घटनास्थळी ग्रामस्थ व पोलिसांनी तत्काळ धाव घेऊन जखमींना रत्नागिरी रुग्णालयात दाखले केले.

अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे जवान, पोलीस यंत्रणांनी मदतकार्य सुरू केले.

या अपघातात सह्याद्री शिक्षण संस्थेचे १३ शिक्षक जखमी झालेले आहेत. सर्व शिक्षक प्रशिक्षणासाठी रत्नागिरीला निघाले होते.

अपघातात जखमी झालेल्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- संकेत जागुष्टे, विराज सावंत, मंदा खाडे,

संमिश्र पानावर



# शुभांशू शुक्ला यांची उद्या अंतराळभरारी

**नवी दिल्ली :** भारताचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्टेशनमध्ये जाण्यास सज्ज झाले आहेत. लखनऊचे शुभांशू शुक्ला १० जूनला सायंकाळी फ्लोरिडा येथील केनेडीच्या स्पेस सेंटरमधून 'स्पेसएक्स'च्या 'फाल्कन-९' रॉकेटमधून आपला अंतराळातील प्रवास सुरू करतील.

शुभांशू शुक्ला 'एक्सिओम स्पेस'च्या चौथ्या मानवी अंतराळ यात्रेला जाण्यास तयार आहेत. ते २८ तासांचा प्रवास करून ११ जून रोजी भारतीय वेळेनुसार, रात्री ११ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहचतील.

शुक्ला या 'एक्सिओम-४' मिशनचे वैमानिक आहेत. त्यांच्यासोबत पोलंडचे स्लावोस्ज उजनांस्की-विस्नीवस्की, हंगेरीचे टिबोर कापू आणि अमेरिकेचे अंतराळवीर पॅगी व्हिटसन हे अंतराळात भरारी घेतील. अंतराळात जाणारे दुसरे भारतीय

संमिश्र पानावर

# २०२६ मध्ये तमिळनाडू, पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकार स्थापणार

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास

**मदुराई :** २०२६ मध्ये होणाऱ्या तमिळनाडू, प. बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजप सरकार स्थापन करेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला.

मदुराई येथे झालेल्या कार्यक्रमात शहा बोलत होते. शहा यांनी तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, तमिळनाडूत

संमिश्र पानावर



# आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत २०१७ चा फॉर्म्युला

## संख्याबळ अधिक असणाऱ्या पक्षाल महापौरपद

**मुंबई :** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नगरसेवक अधिक निवडून आले तर मुंबईचे महापौर पद शिंदे सेनेच्या ताब्यात असेल, असा विश्वास रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केला.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असे आदेश दिले आहेत. त्यानंतर राज्य निवडणूक आयोग कामाला लागला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका ऑक्टोबर महिन्याच्या पंधरवड्यात होतील, असे संकेत राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. तर सर्वपक्षीय नेत्यांनी निवडणुकीसाठी कंबर कसली असून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कामाला लागा, असे निर्देश महायुतीच्या नेत्यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर महायुती स्वबळावर न लढता एकत्र लढेल.



मात्र, सत्तेत आल्यानंतर २०१७ चा फॉर्म्युला वापरला जाईल. भाजपकडे त्यावेळी मुख्यमंत्री पद होते. तर शिवसेनेकडे मुंबई महापालिकेत महापौर पद होते. आगामी निवडणुकीनंतर त्याच पद्धतीने निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. दरम्यान, भाजपला स्थायी समिती तर शिवसेनेकडे महापौरपद ठेवले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक

संमिश्र पानावर

### शिवसेना फुटीनंतर पहिलीच पालिक निवडणूक

शिवसेना फुटीनंतर पहिल्यांदाच मुंबई महापालिका निवडणूक होत आहे. मुंबईत आधीपासून शिवसेनेचे वर्चस्व आहे. मुंबईतील अनेक भाग शिवसेनेचे बालेकिल्ला म्हणून आजही ओळखले जातात. भाजपने १५० जागांवर दावा केला तरी तेवढ्या जागा सद्यस्थितीत देणे योग्य ठरणार नाही. तिन्ही घटक पक्षांकडून जागा वाटपात सामंजस्य भूमिका घेणे गरजेचे आहे. त्यानुसार वरिष्ठ पातळीवर विचारविनिमय सुरू असल्याचे ते म्हणाले.

अ. भा. मराठी साहित्य महामंडळाची घोषणा

# ९९ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात

**पुणे :** ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहुपुरी शाखेला आणि मावळा फाऊंडेशनला मिळणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यासह सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे प्रतिधिनी उपस्थित होते.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित केली होती. ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देऊन आली. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ, औदुंबर, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा इचलकरंजी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शाहुपुरी सातारा या संस्थांकडून निमंत्रणे आली होती.

संमिश्र पानावर

### शाहू स्टेडियमवर होणार संमेलन

नियोजित संमेलन स्थळ छत्रपती शाहू स्टेडियम हे आहे. योगायोग असा की १९९३ साली ६६ वे संमेलन इथेच झाले होते. हे स्टेडियम १४ एकरात असून तिथे मुख्य मंडप, २ इतर मंडप, ग्रंथ प्रदर्शन, कवी गझल कट्टा, तसेच भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. इतर छोटे कार्यक्रम करण्यासाठी तीन सभागृहे उपलब्ध आहेत. स्टेडियममध्ये २५ हजार प्रेक्षक क्षमता असलेली गॅलरी आहे. हे स्टेडियम सातारा बस स्थानकापासून पायी चालत जाण्याच्या अंतरावर असून शहराच्या मध्यभागी असल्याने शहरातील आणि बाहेरून येणाऱ्या साहित्य रसिकांची सोय होणार आहे. स्टेडियमच्या पाठीमागील बाजूस पोलीस परेड ग्राऊंडची ८ एकर जागा असून तिचा वापर पार्किंगसाठी करता येणार आहे.

## संपादकीय

### गुंतागुंतीच्या विषयाला एक दिशा

अगोदर संमतीने संबंध ठेवायचे आणि नंतर पुरुषावर बलात्काराचा आरोप करायचा, अशा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण मत नोंदविले आहे. त्यामुळे अशा गुंतागुंतीच्या विषयाला एक दिशा मिळाली आहे.लैंगिक अत्याचाराचे गुन्हे दाखल होताना बरेचदा कलम ३७६ चा दुरूपयोग होताना दिसत आहे. 'अगोदर संमतीने संबंध ठेवायचे त्यात दुरावा आला की फौजदारी यंत्रणा कामाला लावायची व एखाद्या व्यक्तीला गंभीर गुन्ह्याचा कलंक लावायचा ही पद्धत बंद करा व तक्रारीच्या मुळाशी जाऊन पोलिसांनी व न्यायालयांनी या खटल्याची सत्यता तपासावी', अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना व न्या. सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने २६ मे २०२५ रोजी एक महत्त्वपूर्ण निकाल देत महिलेने दाखल केलेला लग्नाच्या आमिषाने जबरदस्तीने लैंगिक अत्याचार व अनैसर्गिक संबंध ठेवल्याच्या तक्रारीचा गुन्हाच रद्द करण्याचा आदेश दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा 'तक्रार रद्द न करण्याचा दिलेला निकाल' ही रद्द केला आहे. तसेच लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात पोलिसांना व न्यायालयाला मार्गदर्शन करून प्रत्येक संमतीच्या संबंधाला फौजदारी प्रक्रियेत आणू नका व पोलीस दल व न्यायालय यांच्या वेळेची कदर करा, असा सल्लादेखील पोलीस यंत्रणेला दिला आहे.अमोल हुल विरुद्ध महाराष्ट्र सरकार २०२५ सी जे (एस.सी) ५४२ या खटल्यात चार वर्षांचा मुलगा असलेल्या विवाहित महिलेने पोलीस स्टेशनमध्ये अशी तक्रार केली की पदवीचे शिक्षण घेणार्या महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आपल्यावर ८ जून २०२२ ते ८ जुलै २०२३ पर्यंत वेळोवेळी लैंगिक अत्याचार केला असून अनैसर्गिक संबंधदेखील प्रस्थापित केले आहेत. त्यानुसार पोलिसांनी भारतीय दंडविधान कलम ३७६, ३७६ ( २ ) (एन), ३७७, ५०४ व ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला. महिलेच्या तक्रारीनुसार ८ जून २०२२ रोजी तिचा त्या विद्यार्थ्यांशी परिचय झाला व त्याचे रूपांतर मैत्रीत व प्रेमात झाले.त्यानंतर जुलै २०२२ मध्ये एका रात्री तो विद्यार्थी तिच्या घरी गेला व तुझ्या धर्मानुसार तुझा घटस्फोट झाला की आपण लग्न करू असे म्हणून त्याने तिच्याशी संबंध ठेवले. त्यानंतर वर्षभर विविध ठिकाणी लॉजवर जाऊन त्यांचे संबंध आले. तसेच त्याने अनैसर्गिक संबंधदेखील ठेवले व त्या महिलेचे पैसे व कार त्याने वापरली. त्यानंतर ती महिला विद्यार्थ्याच्या गावी गेली व 'माझा आता घटस्फोट झाला आहे तू आता माझ्याशी लग्न कर' अशी मागणी तिने केली. मात्र त्याच्या घरच्यांनी तिला हाकलून दिले व आपण वेगळ्या धर्मांचे असल्याने आता आपल्याला लग्न करता येणार नाही म्हणून तिला फसवल्याबद्दल बलात्काराची तिने तक्रार दिली. दरम्यान, सदर विद्यार्थी याने मुंबई उच्च न्यायालयात सदरची तक्रार खोटी असून आपली बाजू स्पष्ट करत त्या विद्यार्थ्यांच्या वडिलांनी तिच्याविरुद्ध अगोदरच २२ जुलै २०२३ रोजी तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीमध्ये ही महिला माझ्या मुलाला विविध लॉजवर नेऊन त्याच्याशी संबंध स्थापित करून त्याला फोनवरून लग्न कर नाहीतर बलात्काराचा गुन्हा दाखल करेल व कुटुंबाला त्रास देईल, अशी धमकी देत आहे,असे नमूद केल्याचे सांगितले.दरम्यान, सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळाल्यावर विद्यार्थ्याने उच्च न्यायालयात सदरची तक्रार रद्द करावी म्हणून कलम ४८२ नुसार याचिका दाखल केली, मात्र, उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली. त्यामुळे सदर विद्यार्थी सर्वोच्च न्यायालयात गेला. दरम्यान, पोलिसांनी आरोपपत्र देखील दाखल केले. सर्वोच्च न्यायालयाने बाजू ऐकून तक्रारीचे अवलोकन करून काही महत्त्वाच्या बाबीवर प्रकाश टाकत महिलेची तक्रार पाहिली असता ते दोघे प्रेमात पडले, अनेकदा भेटले, अगदी लॉजवर देखील गेले. यावरून तिच्यावर जबरदस्ती केल्याचे स्पष्ट होत नाही. भा.दं.वि. कलम ९० अंतर्गत महिलेची फसवणूक झाल्याचे स्पष्ट होत नाही.

# बापाचे स्वप्न पूर्ण ,मुलगा देशसेवेसाठी प्रशिक्षण घेऊन आल्याने गावात जगी स्वागत

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड** : तालुक्यातील वापटी कुपटी येथील शेतकरी विलास कराळे यांनी आपल्या दोन मुलापैकी एक जण देश सेवेसाठी सीमेवर पाठून आपले कर्तव्य पूर्ण करायचे असे स्वप्न मुल लहान असताना पाहिले होते त्याबाबत त्यांनी गावात अनेकांना हे सांगितले आणि त्याचा लहान मुलगा सौरभ कराळे हा सैनिकी प्रशिक्षण घेऊन गावात परत आल्याने या शेतकरी कष्टकरी बापाचे स्वप्न पूर्ण झाले त्यामुळे गावकऱ्यांनी सौरभ चे गावात जंगी दिजे वर देशभक्ती जित लाऊन फटा क्याच्या आतिश बजित स्वागत केले .दोन मुळापैकी सौरभ नावाचा तरुण आर्मीचे प्रशिक्षण पूर्ण करून आला त्यामुळे त्याचे गावात झालेल्या स्वागत गावाने देश प्रेम आणि देशाप्रती असलेली असीम निष्ठा पाहायला मिळाली गावात प्रवेश दारावर त्याच स्वागत करताना काल जे अनुभवायला मिळालं ते खूप प्रेरणादायी आणि भविष्याच्या दृष्टीने देश एकक्यासाठी दिशादर्षक आणि आज देशातील या भयावह परिस्थितीत एक भक्कम आधार देणारे वाटले देशात जात धर्म नाते गोटे याला दुयमस्थानी ठेवत काल गौरव चां चौकाचौकात सत्कार करण्यात आला त्यात अबालरुद्घ,महीला,पुरुष,तरुणांनी या सत्कार कार्यात सहभाग नोंदवित गावातील सामाजिक बदलाची चाहूल दिली गावात यापूर्वी भागवत संपल्यानंतर निघणारी दिंडी,खलील महाराज,ऋषिष्वर महाराज यांच्या दिंडीला असे वातावरण पाहायला मिळायचे काल त्याही पेक्षा अतीशय उत्साह आणि आपलेपण जाणवत होत सत्कार कार्याला उपस्थित राहण्यासाठी गावा बाहेर असणारे अनेकजण गावात आल्याने ते अनुभवता आल .सौरभ चे वडील विलास कराळे हे गावातील शेतकरी त्याला जोड व्यवसाय म्हणून ऑटो चालवायचे गावातील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कार्यात सहभागी व्हायचे स्पष्ट मत मांडणार माणूस म्हणून ते कायम चर्चेत रयायचा गावातील अनेक अडचणीसाठी मला प्रत्यक्ष भेटून तर कधी फोनवर चर्चा करायचं दोन मुलं,दोन मुली, मुल लहान असतानाच एक मुलगा देशसेवेसाठी देणार असे प्रन करणारा हा छोटा शेतकरी त्याच काल स्वप्न पूर्ण झालं आपल पोरग देशासाठी लढणार असा प्रचंड स्वाभिमान काल त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता त्याच देशावर असलेलं असीम प्रेम पाहून या देशात कितीही नालायक राजकारणी येओत कितीही नालायक प्रवृत्तीचे जातीय,धार्मिक हल्ले करणारे हल्लेखोर येओत त्यांनी कितीही वाटण्याचा प्रयत्न केला तरी हा देश कधीच वाटल्या जाणार नाही असा प्रचंड विश्वास या छोट्याश्या गावातील कार्यक्रमातून वाटला आणि माझ्या गावाचा प्रचंड अभिमान वाटला .गावात मुख्य मार्गावर सर्वांनी त्याच स्वागत केलं नंतर लगेच गावात




प्रवेश केल्या बरोबर ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्ष करून आपल्या समूहाला लीहण्यावाचाण्याचा आणि देशातील सर्व पदावर सर्व आघाड्यांवर जाण्याचा घटनादत्त अधिकार दिला तेथे जाऊन त्याच्या प्रती कृताज्ञता व्यक्त करून महापुरुष ना आदरजली अर्पण केली तिथे त्याचा सत्कार करण्यात आली नंतर गावातील मुख्य मार्गावर सर्व गाव त्याच्या स्वागतासाठी हातात आरतीचे ताठ घेऊन महिला पुरुष उथे पाहून




गावाच्या ऐक्याचा अनुभव आला आणि आम्हाला देश प्रेम शिकवाव लागत नाही ते आम्हचा रक्तात भाग आहे हे यातिमीत्ताने काहीना समजले असावे ऐका सामान्य कुटुबात जनमलेल्या मुलाचा सन्मान आणि त्यान भावानीक वातावरण मला माझ्या गावाबद्दल अधिक सुर्वण काल देणार वाटते काल उपस्थित सहभाग घेणाऱ्या सर्वाच आभार . : सौरभ तुला खुप खुप शुभेच्छा!!!

# शहरात ईद-उल- अज्हा (बकरा ईद ) मोठ्या ढात्यात साजरा

महाराष्ट्र जीत

प्रतिनिधी अब्दुल जुबेर कारंजा लाड शहर -भारत देशाची शान भारतीय संविधान आणि त्या संविधानामध्ये धार्मिक स्वातंत्र्य तसेच भारत देश "धर्मनिरपेक्ष" या देशामध्ये विविध उत्सवांना महत्व दिले जाते हिंदू समाजामध्ये दिवाळी दशहरा होळी तर मुस्लिम समाजामध्ये रमजान ईद ईद-ए-मिलादुन्नबी तसेच बकरी ईद हे महत्त्वाचे उत्सव अति आनंद उत्सवात साजरे केले जातात तसेच हे उत्सव खुशहाली घेऊन येतात , ईद लोकांमधील अंतर दूर करते, ईद उत्सवानिमित्त समाजातील अनुयायी सर्व एका ठिकाणी येऊन रंगीबेरंगी कपडे परिधान करून मुस्लिम नागरिक अल्लाह चे इबादत म्हणजे नमाज अदा करण्याकरिता स. 80.00वाजता बायपास जवळील ईदगाह मैदानावर ईदगाह परिसरात सामूहिक नमाज सकाळी 8:45 वा. अदा करण्यात आली, दरवर्षीप्रमाणे यावर्षी शसुद्धा कश्यप बंधूच्या वतीने वझू करण्यासाठी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली, 'ईद ही ईश्वराची अनोखी भेट आहे, आपल्या घरी आनंद नांदो,"ईद-उल- अज्हा" हा इस्लामचा मुख्य उत्सव आहे, हा सण जगभरातील मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात साजरा करतात."काज़ी-ए-शहर" काज़ी मोहंमद जाकीर यांनी ईदगाह वर उपस्थिती देऊन सर्व मुस्लिम बांधवच्या गळाभेट देऊन 'ईद मुबारक' शुभेच्छा दिली आणि ईदगाहची शान वाढवली.. सोबतच युसूफ सेठ पुंजानी यांनी सुद्धा सर्वाना गळाभेट देऊन ईद ची शुभेच्छा दिली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये किंवा अफ़वा जाऊ नये म्हणून करिता जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला यांनी अतिरिक्त पोलिस दल पाचरण करून चोख पोलिस बंदोबस्त तैनात केला होता..




## मणिपूर पुन्हा पेटले

समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्यासाठी प्रक्षोभक संदेश, चित्रे आणि व्हिडिओ प्रसारित करण्यात येत आहे. त्यामुळे शांतता प्रक्रियेला गालबोट लागण्याची शक्यता आहे. गृह विभागाचे सचिव एन. अशोक म्हणाले, की या घटनांमुळे कोणतीही पूर्वसूचना न देता आपत्कालीन परिस्थितीत इंटरनेट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे असामाजिक तत्त्वे त्यांचा अजेंडा राबवू शकणार नाहीत.

## मोदी सरकारची ११ वर्षे पूर्ण

विजय मिळवले. त्यामुळे काँग्रेस आणि इतर 'इंडिया' आघाडीतील पक्षांमध्ये निर्माण झालेले चैतन्य लवकरच मावळले.

हरयाणा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने लोकसभा निवडणुकीत झालेली पिछाडी भरून काढली. कल्याणकारी उपाययोजना आणि सामाजिक धोरणांमुळे हे शक्य झाले. दिल्लीत भाजपने २६ वर्षानंतर सत्ता मिळवली. 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल यांना त्यांच्या बालेकिल्ल्यात पराभूत केले.

दिल्ली विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक मनोज कुमार म्हणाले की, विरोधक मोदींना थेट आव्हान देण्यात अपयशी ठरले आहेत आणि त्यांचे नेतृत्व जवळपास आव्हानविरहित आहे. राजकारणात नेहमी संधी आणि आव्हाने असतात, पण जोपर्यंत मोदी आहेत तोपर्यंत त्यांना पर्याय दिसत नाही," असे ते म्हणाले. 'ऑपरेशन सिंदूर' या लष्करी कारवाईने त्यांची देशहितासाठी काम करणारा नेता म्हणून प्रतिमा अधिक मजबूत झाली आहे.

जातीय जनगणनेविषयीच्या मुद्द्यांमुळे आणि प्रादेशिक घटकांमुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला काही प्रमाणात नुकसान झाले. मात्र, सरकारने जातगणनेचा निर्णय घेतल्याने भाजपने जनतेला भावणारे मुद्दे हातात घेतल्याचे दिसत आहे, असे कुमार म्हणाले.

'सबका साथ, सबका विकास' या धोरणावर आधारित मोदींचे कल्याणकारी मॉडेल भाजपसाठी फायदेशीर ठरले आहे आणि भविष्यातही ठरेल. कारण मोदी हे जनतेत लोकप्रिय आणि विश्वासार्ह नेते आहेत, असेही कुमार म्हणाले. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारखी जनमान्यतेची प्रतिमा मोदींची झाली आहे. वक्फ (सुधारणा) विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांतून मंजूर करताना तेलगू देसम्, जदयू आणि चिराग पासवान यांच्या लोजप (रामविलास) कडून सरकारला पाठिंबा मिळाला, हे भाजपचे असलेले वर्चस्व दाखवते. 'एक देश-एक निवडणूक' विधेयकावरही सरकारने काम सुरू ठेवले आहे.

तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या वर्षात भाजपने राष्ट्रीय निवडणुकीत गमावलेली राजकीय जागा परत मिळवली आहे. आगामी वर्षात तमिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ – आणि रालोआ शासित आसाम व बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होत असल्याने, भाजप पुन्हा काही आश्चर्यकारक विजय मिळवतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उत्तर हवे असल्यास आम्हाला पत्र लिहा

मोहिमेंतर्गत निवडणूक आयोगाने ६ राष्ट्रीय पक्षांना चर्चेसाठी निमंत्रित केले होते. ५ पक्षांनी निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक केली. पण, काँग्रेसने १५ मेची बैठक रद्द केली.

गांधी यांच्या आरोपांचे खंडन यापूर्वीच निवडणूक आयोगाने केले आहे. गांधी यांनी महाराष्ट्रातील मतदान केंद्रावरील सीसीटीव्ही फुटेज निवडणूक आयोगाकडे मागितले होते. त्यावर निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी सांगितले की, निवडणुकीबाबत याचिका दाखल झाल्यानंतर मतदान केंद्रावरील सीसीटीव्हीचा तपास सक्षम उच्च न्यायालय करू शकते.

आयोगाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, निवडणूक नियमांसोबतच मतदारांच्या गुप्ततेचे संरक्षण करण्यासाठी निवडणूक आयोग असे करते. राहुल गांधी हे मतदारांच्या गुप्ततेचे उल्लंघन का करू इच्छितात. या निवडणूक गुप्ततेचे संरक्षण निवडणूक कायद्यानुसार करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाला पार पाडायची असते. कोणत्याही गोंधळापासून दूर राहण्यासाठी राहुल गांधी यांना उच्च न्यायालयावर विश्वास ठेवला पाहिजे, असे सूत्र म्हणाले.

भारत निवडणूक आयोगाने काँग्रेसला २४ डिसेंबर २०२४ रोजी सविस्तर उत्तर पाठवले असून, त्यात त्यांच्या उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर स्पष्ट आणि तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे. या अधिकृत पत्रव्यवहारानंतरही काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी माध्यमांद्वारे पुन्हा शंका आणि आरोप मांडल्याने आयोगाने याबाबत खेद व्यक्त केला आहे.

गांधी यांनी थेट आयोगाशी संवाद साधण्याऐवजी वारंवार माध्यमांतून आरोप करणे हे आश्चर्यकारक आणि

पान १ वरून

खेदजनक असल्याचे आयोगाचे मत आहे. त्यांनी माध्यमांमध्ये प्रश्न उपस्थित करण्याऐवजी थेट निवडणूक आयोगाशी पत्राद्वारे संपर्क साधावा, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगाकडे विचारलेल्या अधिकृत प्रश्नांना उत्तर देण्याची आमची प्रक्रिया पारदर्शक आणि ठोस आहे," असेही आयोगाने स्पष्ट केले.

## भुशी डॅमध्ये दोन तरुणांचा बुडून मृत्यू

डॅमच्या मागील भागात कुंपण तुटलेले आहे. याचा फायदा घेत काही तरुण कुंपण ओलांडून पाण्यात उतरले. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला.

मृत्यू झालेले दोन्ही तरुण मूळचे उत्तर प्रदेशचे रहिवासी असून, सध्या पिंपरी-चिंचवड येथील डांगे चौक परिसरात राहत होते. यापैकी एकजण एसी मेकॅनिक, तर दुसरा इलेक्ट्रिशियन होता. लोणावळा पोलीस आणि शिवदुर्गा रेस्क्यू टीम यांनी संयुक्तपणे बचावकार्य करत दोन्ही मृतदेह पाण्यातून बाहेर काढले.

## शुभांशू शुक्ला यांची उद्या अंतराळभरारी

शुक्ला हे ४१ वर्षांनंतर अंतराळ प्रवास करणारे दुसरे भारतीय बनतील. यापूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये रशियाच्या सोयूझ अंतराळ यानातून अंतराळाचा प्रवास केला होता.

**मी भाग्यवान**

हा एक अद्भुत प्रवास होता; हे असे क्षण आहेत जे तुम्हाला खरोखरच सांगतात की, तुम्ही स्वतःपेक्षा खूप मोठ्या असलेल्या गोष्टीचा भाग बनत आहात. या मोहिमेत मी सहभागी झालो आहे. त्यामुळे मी किती भाग्यवान आहे हे मी फक्त सांगू शकतो, असे शुक्ला यांनी 'ॲक्सिओम स्पेस'ने जारी केलेल्या एका छोट्या व्हिडीओमध्ये म्हटले आहे.

## २०२६ मध्ये तमिळनाडू, पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकार स्थापणार

पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनता द्रमुकचा पराभव करणार आहे. भाजप व अण्णाद्रमुक एकत्रितपणे तमिळनाडूत रालोआ सरकार स्थापन करणार आहोत. द्रमुक सरकारला सत्तेतून हटवण्याचे व बदलाचे संकेत मिळत आहेत. तमिळनाडूतील जनतेला आता बदल हवा असून भाजप कार्यकर्ते त्यासाठी पूर्ण तयार आहेत, असे ते म्हणाले.

शहा म्हणाले की, एम. के. स्टालिन सांगतात, अमित शहा हे द्रमुकला हरवू शकत नाही. ते सत्य बोलत आहेत. मी नाही तर तमिळनाडूची जनताच तुम्हाला हरवेल. गेल्या १० वर्षांत भाजप सरकारने तमिळनाडूला ६.८० लाख कोटी दिले. तरीही मुख्यमंत्री स्टालिन विचारतात, केंद्राने तमिळनाडूला काय दिले? मी मुख्यमंत्री स्टालिन यांना आव्हान देतो की, २०२१ मध्ये द्रमुकने निवडणुकीत दिलेली सर्व आश्वासने पूर्ण केली का? हे जाहीररीत्या सांगावे, असे ते म्हणाले.

वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यास तमिळमधून करा

केंद्रीय गृहमंत्री म्हणाले की, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यास तमिळमधून सुरू करा. पंतप्रधान मोदी यांनी संसदेत सेंगोल स्थापन करून तमिळनाडूचा सन्मान केला. त्यासाठी स्टालिन हे पंतप्रधानांना पत्र लिहून धन्यवाद देतील, अशी मला आशा आहे.

दरम्यान, अमित शहा यांनी प्रसिद्ध मीनाक्षी मंदिरात जाऊन दर्शन घेऊन पूजा केली. मी तमिळ भाषेतून बोलू शकत नाही याबाबत मला खेद वाटतो, असे ते म्हणाले.

## रत्नागिरीजवळ टँकरची ट्रॅव्हल्सला धडक ; २६ शिक्षक जखमी

स्मिता मधुकर पाटील, उषा खुडे, जयश्री गावडे, प्रियांका जाधव, नेहा मेस्त्री, धर्मेंद्र देऊगडे, दिलीप डोंगरे, सुलक्षणा पाटील, निशिकांत वानरकर, रूपाली सुकांत यादव, श्वेता संजय चव्हाण, हर्षाली पाकळे, नीता विनायक बोंद्रे, मीना घाडगे, सोनाली सावंत, कमल महाडिक, प्रेमकुमार शिवगण, अमोल कोतवाल, मनीषा कांबळी, मालिनी चव्हाण, श्वेता चव्हाण, प्रियांका जाधव, राजेश यादव.

## आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत २०१७ चा फॉर्म्युला

स्वराज्य संस्थांमध्ये मुंबई महापालिका ही महत्वाची महानगरपालिका आहे. गेली २५ वर्षे मुंबई महापालिकेत शिवसेना - भाजपची सत्ता होती. शिवसेनेच्या सत्तेला अनेक राजकीय पक्षांनी सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. २०१७ च्या निवडणुकीत शिवसेनेला ८४ जागा जिंकता आल्या. तर भाजपने ८२ जागा जिंकून शिवसेनेला आव्हान दिले. दरम्यान, पालिकेत सत्ता राखण्यासाठी शिवसेनेला तारेवरची कसरत करावी लागली. भाजपने त्यावेळी सुरूवातीला पहारेकरी नंतर सेनेला बाहेरून पाठिंबा दिला. शिवसेनेचा महापौर झाला होता. दरम्यान, राज्यात मुख्यमंत्रीपद असल्याने शिवसेनेला महापौर पद दिल्याचे बोलले जात होते. आता हाच फॉर्म्युला येत्या निवडणुकीनंतर वापरला जाणार असल्याचे मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले.

## ९९ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात

या स्थळांना भेटी दिल्यानंतर स्थळ निवड समितीची बैठक ८ जून रोजी सकाळी पुणे येथे संपन्न झाली. त्यात साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत स्थळ निवड समितीच्या निर्णयावर महामंडळाने एकमताने शिक्कामोर्तब केले.

प्रा मिलिंद जोशी म्हणाले, साताऱ्याला ३२ वर्षानंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळाला आहे. यापूर्वी १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात संमेलन झाले होते. गेल्या १२ वर्षांपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाची संधी मिळावी यासाठी पाठपुरावा करत होती.

**साताऱ्यातील ४ थे संमेलन**

साताऱ्यात होणारे हे ४ थे संमेलन आहे. १८७८ मध्ये लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांनी ग्रंथकार संमेलन सुरु केल्यानंतर ३ रे संमेलन १९०५ साली रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात झाले होते. १९६२ मध्ये न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली ४४ वे तर १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले होते.

**स्थळ निवड समिती**

या संमेलनासाठी मार्गदर्शन समिती गठीत करण्यात आली असून त्यात प्रा मिलिंद जोशी, गुरय्या स्वामी, सुनिता राजे पवार, विनोद कुलकर्णी, प्रदीप दाते, दादा गोरे आणि डॉ उज्ज्वला मेहेंदळे यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# मतदार सघात रस्ते आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात विकासासाठी कटीबद्ध आ सईताई डहाके

## शहरात ७ कोटी रुपये विकास कामाचे भूमिपूजन









महाराष्ट्र जीत

**कारंजा प्रतिनीधी** : शहरातील विविध नगरात शहरवासीयांच्या समस्या सोडविण्यासाठी सरवोतपरी प्रयत्न करणार असून विधान सभा क्षेत्रात आरोग्य शिक्षण रस्ते आणि सार्वजनिक समस्येचं सोडवणूक करण्यासाठी सदैव प्रयत्न करणार असल्याचे मत आ सईताई प्रकाशदादा डहाके यांनी व्यक्त केले . कारंजा नगरपरिषद हद्दीतील विविध भागात ७ कोटी रुपये विकास कामांचे भूमिपूजन कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आमदार सईताई डहाके यांचे हस्ते ८ जून रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष नरेन्द्र गोलेच्छा तसेच माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके,भाजपा शहराध्यक्षा प्राजक्ता माहितकर,काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. आम. सईताई डहाके यांचे अथक प्रयत्नातून जिल्हा नियोजन समिती वाशिम अंतर्गत कारंजा नगर पालिका हद्दीतील ७ कोटी रुपयांच्या विकास कामाचा भूमिपूजन सोहळा, त्यांच्या हस्ते रविवार ८ जून रोजी पार पडला. लक्ष्मी नगर मधील संतोष ढाकूलकर घर ले गजानन पवार घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ४२,३७,४६६ रुपये, सुपलदास नगर मधील गुळदे घर ते देवळे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ६१,१९,३६५ रुपये, रमाबाई कॉलनी मधील गजानन काजळे घर ते सावंत घर ते दिलीप चव्हान यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ५८,०३,४४६ रुपये,दत्त कॉलनी येथील देशमुख घर ते अड. खंडागळे ते बन्सोड न.प. कॉलनी येथे काँक्रीटरस्ता व नाली बांधकाम करणे ४९,४६,८९० रुपये, महावीर कॉलनी मुर्तीजापूर रोड येथील कथे ते बोरकर यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ४८, ५३२,६२३ रुपये, महावीर कॉलनी येथील ताठे घर ते डॉ.रवी ठाकरे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ३२.८९,४८० रुपये,महावीर कॉलनी येथील मुंदे घर ते अवघन यांचे घरापर्यंत कॉंकीट रस्ता व नाली बांधकाम करणे रुपये,महावीर कॉलनी येथील पांडे घर ते राठोड घर दत्त कॉलनीमध्ये कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ४०,४३,७७४ रुपये, वनदेवी मंदीर बाय पास येथे सभागृह बांधकाम करणे १६,००,५६९ रुपये, मनवर ते सुधाकर नाईक वैभव लक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे १४,२२,१८३ रुपये,शिक्षक कॉलनी मधील हनुमान नंदीर ते शिरे सर घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ३६,८१,५३६ रुपये, मातंगपुरा कारंजा येथे सामाजीक सभागृह बांधकाम करणे १६,३२,९२० रुपये , मंगरूळ वेश ते रामासावजी चौकापर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे १,२८,१०,४७९ रुपये,(लक) वेळ दुपारी १:१५ वाजता १४), कारंजा जि. वाशिम येथील मंगरुळ वेश ते शिवाय नमः मठ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे १०,३२,२७१ रुपये, कारंजा नगर परिषद हद्दीतील नगरपरिषद शाळामध्ये शौचालय बांधकाम करणे ६६,२८,३३१ रुपये अशा एकूण ७ कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्ष नरेन्द्र गोलेच्छा, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, डॉ.राजीव काळे, उत्तमराव ताथोड,विजय काळे ,भाजपा शहराध्यक्ष प्राजक्ता माहितकर,सविता काळे इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.आयोजित भूमिपूजन कार्यक्रमाला महायुतीचे पदाधिकारी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ग्रा.का. ईटग्याळ येथे "शिवपताका" ध्वजारोहण

## अठरापगड- बारा बलुतेदार सर्व धर्म ऐक्य विचारांचे रयतेमध्ये शिवरायांनी बीज पेरले - व्यंकटराव पाटील



महाराष्ट्र जीत

दिलीप मादाळे : मुखेड तालुक्यातील मौजे ईटग्याळ प.दे येथे 6 जून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक सोहळा दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालय समोर शिव पताका ध्वजारोहण सरपंच प्रतिनिधी व्यंकटराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी गावातील ग्राम संसद मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा ठेवून पुष्पहार घालून वंदन करण्यात आले, यावेळी सरपंच प्रतिनिधी व्यंकटराव पाटील, संभाजी पाटील, हुलबा पाटील, उपसरपंच रामचंद्र झुडपे, देविदास झुडपे, विठ्ठल झुडपे, गोविंद खुणे सावकार ,भुजंगा मानके, पांडुरंग राजुरे, लक्ष्मणराव जाधव, जैनुद्दीन शेख, मारुती सोनकांबळे, यादव देवकते, भानुदास देवकते, परशुराम आडगुलवार सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा समोर पुष्पहार ठेवून अभिवादन केले यावेळी सर्व बहुजन बांधव उपस्थित होते. व्यंकटराव पाटील उपस्थित बांधवांना संबोधताना छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना म्हणजे लोकशाहीचं अस्तित्व , महाराजांनी सर्व धर्म सर्व जाती यांना सोबत घेऊन स्वराज्याची तोरण बांधली, आजच्या आधुनिक युगात त्यांच्या शिवकालीन हिंदवी स्वराज्याचा विचार, मराठी भाषिकांचा लेखाजोखा, संस्कृती पुढे घेऊन जाणे सर्व बहुजनांचे कर्तव्य आहे असे संबंधित केले.

# उरण मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला खिंडार, अजित पवार गटात जोरदार प्रवेश




महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव प्रतिनिधी / कळंबोली वार्ताहर** - रायगड जिल्यातील उरण तालुक्यातील अनेक शेकाप, शिवसेना ठाकरे गट यांचे नेत्याचे पक्षांतर चालू आहे . काही महिन्यांपासून ठाकरे गट, शेकापला रायगडा जिल्यात मोठा हादरा बसला आहे. त्यापाठोपाठ आता रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात शरद पवार यांच्या पक्षालाही खिंडार पडले आहे. उरणमधील शरद पवार गटाच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आता घड्याळ हाती घेतले आहे. उरणच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार गटात प्रशांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री सुनील तटकरे यांची भेट घेतली. तर अजितदादा पवार गटात जाहीर पक्षप्रवेश केला आहे. यामध्ये प्रशांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुकाध्यक्ष पदाची धुरा सांभाळलेले मनोजद भगत, माजी कार्याध्यक्ष रमण कासकर, प्रवक्ते अजित पाटील , भेंडखळ ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य लिलेश्वर भगत, तत्कालीन तालुका सरचिटणीस भूषण ठाकूर, उरण विधानसभा सरचिटणीस निलेश पाटील, तत्कालीन उरण तालुका ओबीसी सेल तालुकाध्यक्ष मच्छिंद्र आदी पदाधिकाऱ्यांनी यावेळी प्रदेश कार्यालयात सुनील तटकरे यांच्या हस्ते जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी पक्षाचे विद्यमान तालुका अध्यक्ष परिक्षित प्रकाश ठाकूर, प्रदेश सरचिटणीस गर्जे, आनंद परांजपे, उरण विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर आदी उपस्थित होते.प्रदेश कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रवाहात आल्याचे समाधान व्यक्त केले. नव्याने पक्षात आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा योग्य तो सन्मान राखला जाईल असे सुनील तटकरे यावेळी म्हणाले.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार गटात सामील होणाऱ्यांची वाढली आहे. तर ठाकरे गटासोबतच शेकाप आणि शरद पवार गटाला धक्का बसला आहे. त्यामुळे पक्षवाढीचे आव्हान या पक्षांसमोरअसणारआहे.

# केंद्र सरकारने ओबीसी, एससी, एसटी शिष्यवृत्त्यांमधे २०१० नंतर वाढ केली नाही-मनवर

## दर ५ वर्षांनी शिष्यवृत्तीचे दर वाढविण्याच्या नियमास बगल.....

महाराष्ट्र जीत

तालुका प्रतिनिधी/ मंगरुळपीर : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयामार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. मात्र, या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ २०१० पासुन वाढ केली गेली नाही. या पार्श्वभुमीवर मावळा संघटनेचे उपाध्यक्ष राहुलदेव मनवर यांनी वाशीम-यवतमाळचे खा.संजय देशमुख यांचेशी चर्चा केली. त्यावर त्यांनी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री विरेंद्रकुमार यांना पत्र दिले आहे. तसेच येत्या अधिवेशनामधे हा विषय लावून धरणार असल्याचे मत व्यक्त केले.या योजनेंतर्गत अनुसूचित जाती एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागास वर्ग (ओबीसी), विशेष मागास गट (एनटी, डीएनटी) आणि अल्पसंख्याक धर्मीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जाते. त्यामधे वर्ग ११ वी ते विविध शाखातीत पदवी, पदवीका, पदव्युतर पदवी अशा ४ गृपद्वारे दर आकारलेले आहेत. यातील गृप ३ च्या विद्यार्थ्यांना २००४ पर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १८५० रुपये होती. त्यानंतर २०१० मध्ये तत्कालीन मनमोहनसिंग सरकारने ती वाढवून ३ हजार रुपये केली. मात्र त्यानंतर गेल्या १५ वर्षांत महागाई प्रचंड वाढली असली तरी शिष्यवृत्तीच्या रकमेत एक पैसाही वाढ करण्यात आलेली नाही. याउलट १२ वर्षानंतर केंद्र सरकारने २०२२ मध्ये कोणत्याही शासन निर्णयाविना, नियमबाह्य आदेशाद्वारे गृप १ ते ४ च्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत बदल केलेत. सदरचे बदल हे मार्च २०२६ पर्यंत कायम ठेवले जाण्याचे परिपत्रक आहे. मात्र सदरच्या बदलामधे शिष्यवृत्ती रकमेत नियमानुसार वाढ न करता अत्यल्प वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रुप-III च्या रक्कमेत कोणतीही वाढ केली नाही. त्यामुळे त्यांना २०१० ला निर्धारीत केलेल्या ३००० रुपये रक्कमेत वाढ केलेली नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे केंद्र शासन देशाच्या युवकांचे नावं घेवून वल्गना करीत असेलही मात्र त्यांना पदवीचे शिक्षण सुद्धा पुर्ण करता येवू नये असे जाणिवपुर्वक प्रयत्न करीत असल्याचे मनवर यांनी खा.देशमुख यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

आज देशातील बहुतांश शाळा आणि महाविद्यालयांचे शुल्क, प्रवेश फी, परीक्षा फी तसेच इतर शैक्षणिक खर्च दरवर्षी वाढत असताना, शिष्यवृत्तीमधे मात्र वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्र सरकारने याबाबत लवकरात लवकर शिष्यवृत्त्यांच्या रकमेत वाढ करण्याची मागणी मावळा संघटनेने १४ एप्रील रोजी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्र्यांना निवेदन पाठवून केली होती. याचीच दखल घेत खा.देशमुख यांनी केंद्र शासनास मागणी केली आहे.

केंद्र सरकारने मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या रकमेत १५ वर्षांपासून वाढ करण्यात आलेली नसल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या देश भरातील कोट्यावधी ओबीसी, एस.सी, एस.टी, विद्यार्थ्यांना आर्थीक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीची च्या रक्कमेत ज्या निकषाद्वारे २००४ वरून २०१० ला वाढ करण्यात आली त्याच निकषाद्वारे १५ वर्षाच्या महागाई दरानुसार वाढ करण्याची मागणी केली मनवर यांनी केली आहे. या योजनेचा ६० टक्के आर्थीक वाटा केंद्र सरकार तर ४० टक्के राज्य सरकार खर्च करते सद्या राज्यात आणी केंद्रात भाजपचेच सरकार आहे. त्यामुळे देशात मोदी आणी राज्यात २ अडीच वर्षे सोडले तर २०१४ पासुन भाजपाचेच सरकार आहे त्यामूळेच ओबीसी विरोधी धोरण राबवीले जात असल्याचे राहुलदेव मनवर यांनी म्हटले.

# शिवरायाचा राज्याभिषेकदिन काजळेश्वरात साजरा

महाराष्ट्र जीत




नकुल उपाध्ये / कारंजा लाडः कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे शिवरायाचा राज्याभिषेक दिन ग्रामपंचायत भवन येथे साजरा करण्यात आला .यावेळी सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांचे हस्ते शिवरायाचे प्रतीमेचे पुजन करून हारार्पन करण्यात आले . शिवरायाचा भगवा ध्वज फडकविण्यात आला . यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सतीष वरघट; उपसरपंच तैसीम भाई; पोष्ट मास्टर दिपक चौधरी; ग्रामपंचायत सदस्य गण तथा ग्रामपंचायत कर्मचारी यांची प्रमुख उपस्थीती होती . सर्वानी छत्रपती शिवरायांचे प्रतीमेचे पुजन करून त्यांना अभिवादन केले . सरपंच नितीन पाटील यांनी उपस्थितांना शिव राज्याभिषेक संदर्भात माहीती दिली . कार्यक्रमाचे संचलन निकेत उपाध्ये यांनी तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य भोला सावळे यांनी केले .

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तहसीलदारांना निवेदन

## सारकिन्ही,,शासनाच्या श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार पेन्शन योजनेत विलंब

महाराष्ट्र जीत

**भारत चव्हाण** : अनियमिततेबाबत रिपाई विदर्भ संघटक सागर मानकर साहेब व जिल्हा अध्यक्ष सुनील अवचार यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाई युवा तालुकाध्यक्ष जनार्दन खिल्लारे यांनी स्थानिक वृद्ध नागरिकांना घेऊन तहसील कार्यालयात धाव घेतली. "लाडकी बहीण" योजनेप्रमाणे नियमित मासिक पगार द्यावा, या मुख्य मागणीसह तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

**चार महिन्यांची थकबाकी, रक्कमही अपुरी**

निवेदनात म्हटले आहे की या योजनेतून मिळणारा अनुदान तीन-चार महिन्यांनंतरच जमा होतो आणि तेव्हाही रक्कम अपुरी असते. "वयोवृद्धांसाठी हाच एकमेव आधार आहे. विलंब झाल्याने औषधोपचार, अन्नधान्य अशा मूलभूत गरजा भागवताना मोठा त्रास सहन करावा लागतो," असा आरोप लाभार्थ्यांनी केला.

**"लाडकी बहीण योजनेप्रमाणे मासिक पेमेंट द्या"**

लाभार्थ्यांनी तहसीलदारांना साकडे घालत स्पष्ट केले, "लाडकी बहीण योजनेत लाभार्थीना दरमहा रक्कम वेळेवर मिळते; तसेच आमचाही पगार महिन्या-महिन्याला नियमित द्यावा." त्यांनी प्रशासनाला हात जोडून विनंती केली, जर ही मागणी मान्य न झाल्यास कायदेशीर आंदोलनाचा इशारा दिला आहे. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारत सांगितले की, "योजनेचा निधी उशिरा आल्यानं अडचण निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद आणि समाजकल्याण विभागाशी समन्वय साधून थकीत हप्ता त्वरित वितरित करण्याचा प्रयत्न करू."युवा तालुका अध्यक्ष जनार्दन खिल्लारे यांनी रिपाई च्या वतीने प्रशासनाला १५ दिवसांची मुदत दिली असून तोपर्यंत निर्णय न झाल्यास जिल्हा मुख्यालयावर धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे.यावेळी रिपाई तालुकाप्रमुख जुगलकिशोर जामनीक, जिल्हा महानगर अध्यक्ष ब्रह्मानंद प्रधान, गणेश कुटे, अक्षय चोंडकर, विकी वाघमारे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते



# पुरंदर तालुक्यातील अवैद्य धंद्याना बळ देणारा आका कोण ? नागरीकांना प्रश्न ,

महाराष्ट्र जीत

शामराव जगताप सासवड : पुरंदर तालुक्यातील राजकीय सामाजिक ,शैक्षणिक , सांस्कृतिक सांप्रदायिक ऐतिहासिक पार्श्वभूमी व ओळख बिघडविण्याचे काम अवैद्य धंद्यामुळे होत आहे, तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे, अनेक तरुणांचा कल अवैद्य धंद्याकडे वळत आहे, अनेक कुंटूंबे अवैद्य धंद्यामुळे उध्वस्त झाले आहेत .

हे धंदे बंद करण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न करुनही अवैद्य धंद्याचा समुळ नष्ट होत नाही. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील सर्व प्रकारच्या अवैद्य धंद्याला बळ देणारा आका कोण ? राजकीय की शासकीय ? असा प्रश्न पुरंदर तालुक्यातील नागरीकांना पडला आहे.

सासवड जेजुरी यांसह पुरंदर तालुक्याच्या विविध गावात भर लोकवस्तीत अवैद्य देशी, विदेशी हातभट्टी अशी मद्यविक्री, जुगार राजरोसपणे सुरु आहे, गांजा मटका चक्री अशा प्रकारे सुरु आहेत, अनेक परवानगी नसलेल्या हॉटेल ढाब्यावर अनाधिकृतपणे देशी विदेशी मद्यविक्री केली जात आहे. शहरी भागात लॉजवर देहविक्री चालू आहेत, यामध्ये सर्व सामान्य नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, याबाबत अनेक तक्रारी येऊन देखील त्यावर ठोस कारवाई होत नाही, उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग यांच्या कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर अवैद्य धंद्ये सुरु आहेत सासवड पोलीस स्टेशनचे दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे अवैद्य धंद्ये करणारा बरोबर आर्थिक हितसंबंध आहेत असा ठपका ठेऊन त्यांना निलंबित करण्यात आले आहेत.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांनी अवैद्य धंदे बंद करण्यात यावेत या मागणीसाठी विविध पक्ष संघटनेच्या पाठींब्यावर, दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी सासवड पोलीस स्टेशन समोर जाहीर टाळनाद आंदोलन केले . होते, दि. २१ एप्रिल २०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग सासवड यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले होते यावेळी आंदोलन कर्ते सामाजिक कार्यकर्ते यांच्या बरोबर पोलीस प्रशासनाने चर्चा केली यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग मा तानाजी बरडे साहेब यांनी पंधरा दिवसात सर्व प्रकारचे अवैद्य धंदे बंद करण्यात येतील असे लेखी आश्वान दिल्यानंतरही आजही सर्व प्रकारचे अवैद्य धंदे राजरोसपणे सुरु आहेत, नुकतेच काही दिवसांपूर्वी दारुच्या वादात सासवड येथे एका व्यक्तीचा खून झाला आहे.पोलीस प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नः चिन्हं निर्माण होऊन , लोकांच्या मनात शंका निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे पुरंदर तालुक्यातील अवैद्य धंद्याना बळ देणारा आका शासकीय की, राजकीय हा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यामुळे, वरीष्ठ पोलीस अधिकारी संबंधित खात्याचे मंत्री पालकमंत्री व लोकप्रतिनिधी हे या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहतील का ? हे पाहावे लागेल,,



दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इगोले



## प्रतिनिधी नेमणे आहे

संपूर्ण महाराष्ट्रात **" दैनिक महाराष्ट्र जीत"** या अल्पवधी लोकप्रिय झालेल्या दैनिक वृत्तपत्रास काम करावयास सुवर्णसंधी आता प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे नवनिर्वाचित प्रतिनिधी छायाचित्रकार लेखक जाहिरातदार नेमणे आहे चला संधीचा फायदा...

**संपर्क**

मुख्य संपादक :
**सागर राणा अंभोरे**
मो. 99210 45121

संपादक :
**बंडूभाऊ इंगोले**
मो. 96044 30002

**ड्रॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक कारंजा जी. वाशीम**